**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, टेलिकॉम बिल्डिंग नं २,**
**महात्मा गांधी रॉड, फाउंटन, मुंबई - ४०० ०३२.**

दूरध्वनी क्र. ०२२-२०८२६४९८ ई-मेल : dytccomp.tpt-mh@gov.in

क्र.पआका/का-११/HSRP/२०२५/जा.क्र/१४५६२ **दिनांक : 28 NOV 2025**

**प्रति,**
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**

**विषय :** दि.०१/०४/२०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (HSRP) बसविण्याबाबत.

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.६८/२०२४ जा.क्र.१४८७९दि.२३.१२.२०२४.
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १८/२०२५ जा.क्र. ३५२५दि.२०.०३.२०२५.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३७/२०२५ जा.क्र. ६५६१ दि.०२.०६.२०२५
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४२/२०२५ जाक्र ७३५२ दि. २०.०६.२०२५
५. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५५/२०२५ जाक्र ९७३४ दि. १४.०८.२०२५
६. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.७०/२०२५ जाक्र १४५६० दि. २८.११.२०२५

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्याची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या G.S.R. ११६२ (E) दि. ०४/१२/२०१८ व S.O. ६०५२ (E) दि. ०६/१२/२०१८ नुसार दि. ०१/०४/२०१९ पासून नोंदणी होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना HSRP बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १३०२९/१९८५ (एम.सी. मेहता विरुद्ध केंद्रशासन) मध्ये दि. ०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना HSRP बसविण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून HSRP बसविण्याच्या कामाचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.

या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ६ मधील परिपत्रकानुसार ०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना HSRP बसविण्यासाठी दिनांक **३१/१२/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दि. ०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना HSRP बसविण्याच्या कामाला गती येण्यासाठी व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी विहित वेळेत पूर्ण होण्यासाठी, या कार्यालयाच्या संदर्भीय परिपत्रक क्र. ३ नुसार दिलेले निर्देश कायम राहतील.

तसेच, जुन्या परिपत्रकानुसार HSRP न बसविलेल्या वाहन मालकांचे वाहन हस्तांतरण,पत्ता बदल करणे, कर्जबोजा चढविणे, कर्जबोजा उतरविणे इत्यादी कामांवर निर्बंध लावण्यात आले होते. यापुढे HSRP न बसविलेल्या वाहन मालकांच्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण इत्यादी सर्व कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) थांबविण्यात यावीत. तसेच वायुवेग पथकामार्फत वाहन तपासणीमध्ये जप्त केलेल्या वाहनांना HSRP लावल्याशिवाय सोडण्यात येऊ नये.

**(मा. परिवहन आयुक्त यांच्या मान्यतेने)**

28/11/25

**( गजानन ठोंबरे )**
**सहा. परिवहन आयुक्त (संगणक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**